महामंडलेश्वर
स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे

**सत्संग - प्रवचन**

# करावे तसे भरावे



(प्रथम आवृत्ती)

- प्रकाशक -
ॐ परमानंद प्रकाशन
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**
भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)
मो.: ९४२३३९७६०७

किंमत : दहा रुपये (१०/-)

## निवेदन

आजच्या युगामध्ये बरेचसे लोक विवेकाला विसरत चालले आहे. म्हणजेच शाश्वत काय आहे, आणि आशाश्वत काय आहे? पाप आणि पुण्य काय आहे? धर्म आणि अधर्म काय आहे? सद्‌गती आणि दुर्गती कोणत्या कारणाने होते? मृत्यूनंतर आपल्या सोबत काय येईल आणि काय येणार नाही? या संदर्भात बऱ्याच लोकांनी जवळ जवळ विचार करणेच सोडून दिलेल आहे. म्हणून काहिही विचार न करता रात्रंदिवस जे मनात आले ते करतात. जे मनात आले ते खातात, जे मनात आले ते पितात. असाच व्यवहार बऱ्याच ठिकाणी पहायला मिळतो.

लोकांचे आचार विचार जेव्हा भ्रष्ट होतात तेव्हा समाज जीवनामध्ये दुःख अशांती पसरते. एक म्हण आहे की, **''आचार भ्रष्टी, तो सदा कष्टी''** ज्याचे आचरण भ्रष्ट झाले तो नेहमी कष्टी म्हणजे दुःखी राहतो आणि त्याच्या सानिध्यात जो येतो तो देखील दुःखी होतो अशा प्रकारे संपूर्ण समाज दुःखी होतो.

समाज सुखी, समाधानी राहण्यासाठी प्रत्येकाच्या मनात नेहमी विवेक जागृत राहणे अतिशय आवश्यक आहे. म्हणजेच

सत्य आणि असत्याचा निश्चित निर्णय करून असत्याचा त्याग आणि सत्याचे ग्रहण होणे अतिशय आवश्यक आहे.

स्वामीजींच्या ''करावे तसे भरावे'' या प्रवचानाने अपेक्षा आहे, की साधक, शिष्य, भक्तगण, सत्य-असत्याचा, पाप-पुण्याचा, धर्म-अधर्माचा निर्णय करून सत्याचा, पुण्याचा, धर्माचा, आश्रय घेऊन सुखी होतील. या अपेक्षेने हे अनुष्ठान काळातील तिसऱ्या दिवसाचे प्रवचन रूपी पुस्तक आपल्या हातात देतांना आम्ही धन्यतेचा अनुभव करत आहोत.

**- प्रकाशक**



**माय बाप सवे नये धनवित्त । करावे संचित भोगावे**
**ते म्हणुनी लाभ काय तो विचारी । नको चालिवरी चित्त ठेवू**
**आयुष्य शेवटी सोडूनि जाणार । नव्हेची साचार शरीर हे**
**तुका म्हणे काळे लावियेले माप । जमा धरि पाप पुण्याची ही**

◆ ◆ ◆ ◆ ◆

**माय बाप सवे नये धन वित्त ...**

जपानुष्ठान सोहळयाच्या निमित्त्याने आज हे तिसऱ्या दिवसाचे रात्रीचे प्रवचन आहे. पहिल्या दिवशी रात्री जे प्रवचन ऐकले होते. त्याचा थोडक्यात सारांश हा होता की, आपल्या मनाला उपदेश केला पाहिजे की, हे मनोबा मायाजाळामध्ये गुंतू नको. मायाजाळामध्ये गुंततो त्याला काळ खातो. त्याची अधोगती होते. या डोळयाने जे दिसते ते सर्व माया आहे, मिथ्या आहे.

दुसऱ्या दिवसाचा प्रवचनाचा सारांश देखील आपणास आठवत असेल की हा संसार सर्व मृगजळा प्रमाणे मिथ्या आहे. नश्वर आहे, क्षणभगुंर आहे, दुःखरुप आहे. स्वप्नवत आहे. म्हणून या संसाराची आसक्ती धरू नये.

रात्रीचे दोन्ही प्रवचन ज्यांनी एकाग्र मनाने ऐकले असेल, मनन चिंतन केले असेल, तर असेही होऊ शकते की, काहींच्या मनामध्ये अशी शंका निर्माण होऊ शकते की, सर्व मायाजाळ आहे, मिथ्या आहे. तर जीवनामध्ये काय करायला पाहिजे ? या शंकेचे

समाधान होण्यासाठी आजचे हे प्रवचन सावधान होऊन एकाग्र मनाने श्रवण केले पाहिजे.

या अभंगाच्या प्रथम चरणामध्ये संत तुकाराम महाराजांनी सांगितले की, आपल्या मृत्यूनंतर आपल्या सोबत आई-वडील येणार नाही. तसेच त्यांनी दिलेले धन किंवा आपण कमावलेले धन काहीच आपल्या सोबत येणार नाही. ते आपल्या सोबत येणार नाही किंवा धन आपल्या सोबत का येणार नाही ? याचे उत्तर तर सर्व जाणतात. व संत एकनाथ महाराज म्हणतात...

**नाशिवंत धन नाशिवंत मन । नाशिवंत जाण काया सर्व**
**नाशिवंत देह नाशिवंत संसार । नाशिवंत विचार न करिती**
**एका जनार्दनी सर्व नाशिवंत । एकची शाश्वत हरिनाम**

धन, संपत्ती सर्व नाशवान आहे. सर्व जाणतात की मृत्यूच्या पहिले धन आपणास सोडून जाईल आणि नाही गेलेतर आपणास त्यास सोडून जावेच लागेल. आपल्यासाठी तर ते नाशवानच झाले. आपल्या सोबत ते नेहमी राहणार नाही.

हे ही सर्व जाणतात की, सर्व काया म्हणजे शरीर भले ते कोणाचेही असो नाशवान आहे. एवढेच नव्हे तर सर्व संसारच नाशवान आहे. क्षणभंगूर आहे. जर सर्व संसारच नाशवान आहे, तर संसारातील आई-वडिल किंवा त्यांनी दिलेले धन किंवा कमावलेले धन, आपल्या सोबत मृत्यूनंतर कसे येऊ शकते ? आणि जर जन्म देणारे आई-वडिल आपल्या सोबत येऊ शकत नाही तर इतर सगे संबंधी तर येऊच



शकत नाही. या सर्वांना येथेच सोडून जीवात्म्याला विवश होऊन एकटेच जावेच लागते. भले ही त्याची इच्छा असो अगर नसो. सर्वांना आपले मानत असतांना देखील सर्वांना सोडून एक दिवस जावेच लागेल. या भजनामध्ये किती सत्य सांगितले आहे.

**मन फुला फुला फिरे जगतमें कैसा नाता रे ।।धृ।।**
**माता कहे यह पुत्र हमारा बहेन कहे भाई मेरा**
**भाई कहे यह भुजा हमारी । नारि कहे नर मेरा रे ।।१।।**

मृत्यू येण्याच्या पूर्वी बरेचजन इतके माझे सगे संबंधी आहे. मला संसारामध्ये काय कमी आहे. माझे कोण काय बिघाडू शकतो. इत्यादी अनेक घमंडी विचार मनात घेऊन या संसारामध्ये फिरत असतो. इतरही त्याला आपला नातलग सगासंबंधी माणून त्याच्या अहंकाराला वाढवित असतात.

एक दिवस तो क्षण त्याच्या जीवनात येतो जो प्रत्येकाच्या जीवनात एक ना एक दिवस येतच असतो. तो क्षण म्हणजे मृत्यू..

मृत्यू होताच...

**पेट पकडके माता रोये । बाह पकडके भाई**
**लपटी झपटी के तिरीया रोये । हंस अकेला जाई**

जीवाचा मृत्यू होताच सर्व त्याच्या देहाला धरून रडायला लागतात. कोणी हाताला धरून, कोणी पायाला धरून, कोणी डोक्याला

धरून, कोणी पोट किंवा छातीला धरून जोर-जोराने रडायला लागतात. भलेही कितीही सगे संबंधीयांनी त्याला धरले असेल, कितीही अश्रू गाळले असेल, परंतु जीवात्म्याला तर एकट्यालाच जावे लागते. जाणारा कितीही प्रिय असेल त्याला कोणी रोखू शकत नाही. किंवा रडणारा कितीही जाणाऱ्याला प्रिय असेल तरीही जाणारा रडणाऱ्याला सोबत घेऊन जाऊ शकत नाही. एकटेच जीवात्म्याला जावेच लागते.

जीवात्मा देहाला सोडून एकटाच जातो. त्यानंतर ज्या देहाला जीवात्म्याने माझा देह मानला होता, रात्रंदिवस मोठ्या प्रेमाने त्याचा सांभाळ केला होता. सर्दी-गरमी, उन-वारा-पाऊस इत्यादी पासून त्याला वाचविले होते, कपड्यांनी, दाग-दागिण्यांनी त्याला सजविले होते, कधी कधी तर पाप, छल, कपट करून त्याचे भरण, पोषण केले होते, आणि सगे संबंधीयांनी ज्याला आमचा सगा संबंधी माणून पालन-पोषण केले होते. ज्या देहाला खूप स्नेह, प्रेम दिले होते, जीवात्माने ज्या देहाला माझा आणि सगे संबंधीयानी आमचा नातलग माणले होते. त्या देहाची मृत्यूनंतर काय गती होते हे तर सर्वच बघतात...

**चार गजी चरगजी मगाया चढा काठ की घोरी**
**चारो कोने आग लगायो फूक दियो जस होरी रे**

चार माणसे चार बांबूपासून बनविलेली चौपाई आणतात. त्याच्यावर त्याला बांधल्या जाते. आता त्याच्या मुखाला कोणी पाहण्याची इच्छा करीत नाही. रस्त्याने घेऊन जातात तर त्याला बघून कोणी अपशकुन मानतो. स्मशानात नेवून लाकडांची चिता तयार करतात



आणि ज्यांनी त्याला अत्यंत जवळचे माणले होते तेचे त्याच्या चितेला अग्नी लावून देतात. जसे होळीच्या दिवशी अनावश्यक वस्तूला आग लावल्या जाते. आग लावल्यानंतर काय होते ?...

**हाड जरै जस जंगल लकडी । केस जरै जस घास ।**
**सोना ऐसी काया जल गई । कोई न आयो पास रे ।।**

जंगलातील लाकडे जसे जळतात त्याच प्रमाणे हाडके जळतात. आणि जसे गवत जळते त्याच प्रमाणे केस जळतात. सोन्यापेक्षा बहुमूल्य शरीर जळून जाते. अशा शरीराला जळण्यापासून वाचविण्यासाठी आता त्याच्यापाशी कोणीही येत नाही.

हे सर्व बघितल्यानंतर, ऐकल्यानंतर, वाचल्यानंतर एक प्रश्न जरुर मनात येतो की शेवटी आपल्यासोबत काय येते ? आणि जीवनात काय करायला पाहिजे ? याच्या उत्तरासाठी म्हणताता की,

**करावे संचित भोगावे ते ।**

जीवनामध्ये जे कर्म केल्याजाते भलेही ते चांगले असे की वाईट असो, पाप कर्म हो की पुण्य कर्म हो, धर्ममय कर्म असे की, अधर्ममय असे त्या कर्माचे फळ भोगावेच लागते. जो कर्म करतो त्या कर्माचे संचित बनते. या जन्मामध्ये किंवा पुढील जन्माध्ये त्याला ते भोगावेच लागते. कर्म फळाच्या बाबतीत भगवंत म्हणतात..

**कर्म प्रधान विश्व करी राखा । जो जस करई तस फल चाखा ।।**

जो जसे कर्म करतो त्याला तसेच फळ भोगावे लागते. कारण की, ही कर्म भूमी आहे. या कर्मभूमीमध्ये जो जसे कर्म करतो तसे त्याला फळ भोगावे लागते. आणि कर्मा प्रमाणे जीवाला सद्‌गती किंवा दुर्गती प्राप्त होते. जसे...

**उँच कर्म से उचगती । उँचे उच हो जाय**
**क्रमश ः मानुष जन्म ले अमर धाम को पाय**

भलेही कोणी कितीही निच असेल परंतु तो जर निच कर्म सोडून चांगले कर्म करत असेल तर चांगल्या कर्माने उंच पदाला पोहचून अमरत्त्व प्राप्त करतो. मोक्ष प्राप्त करतो.

चांगल्या कर्माने जसे चांगले पद किंवा धाम किंवा मोक्ष प्राप्त करतो. त्याच प्रमाणे कोणी कितीही महान असेल, परंतु जर निच कर्म करायला लागला तर तो त्या निच कर्माने निच गतीला जातो. जसे...

**निच कर्म से निच गती । त्रिर्यग् योनी पर्यन्त ।**
**कहही चौऱ्यासी लक्ष तक । जिसने जाना अन्त ।।**

निच कर्माने, पाप कर्माने, अधर्माच्या रस्त्याने चालल्याने, आचरण भ्रष्ट झाल्याने, अधर्म, अकर्म केल्याने जीवाची अधम गती निच गती होते.



म्हणून नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. की जसे कर्म केल्या जाते त्याच प्रमाणे फळ भोगावे लागते.

**''करावे तसे भरावे ।''**

ही म्हण सर्वच जाणताता. भलेही तो कितीही महान असो. कर्म केल्यानंतर चांगले वाईट फल भोगावेच लागते. त्या कर्म फळाला अनेक नावाने ओळखल्या जाते. जसे...

**बखत कहो या करम कहो । नसिब कहो निरधार**
**सहस्त्र नाम है करम को । मन ही सिरजनहार ।।**

म्हणून जो जसे कर्म करतो त्याला तसेच त्या कर्माचे फळ भोगावेच लागते. काया वाचा मनाने कर्म होतात. परंतु सर्व कर्माचे मूळ मनच असते. शरीराने अथवा वाणीने कर्म करण्याचा संकल्प पहिले मनात निर्माण होतो. म्हणून...

**म्हणूनी लाभ काय तो विचारी । नको चालीवरी चित्त ठेवू ।**

कोणते कर्म करायला पाहिजे, कोणते कर्म करू नये. कोणते कर्म करणे अधर्म आहे, पाप आहे, अधोगतीला नेणारे आहे, दुःख देणारे आहे, चिंता उत्पन्न करणारे आहे, भय निर्माण करणारे

आहे. हानी ही हानी करणारे आहे याचा मनामध्ये चांगला विचार करून ते कर्म टाळले पाहिजे.

कर्म करतांना लाभ हानीचा विचार जरूर केला पाहिजे. जे कर्म केल्याने लाभ ही लाभ आहे म्हणजेच धर्ममय आहे, आनंद, सुख, समाधान, शांतता, निश्चिंत आणि निर्भय फळ देणारे आहे, ते कर्म करायला पाहिजे.

बरेचसे लोक अधर्माच्या रस्त्याने चालतात. अधर्माच्या रस्त्याने चालून सुखाची इच्छा करतात. काही तर खाण्यासाठी आम्ही जन्माला आलेलो आहोत असे माणतात. जे मिळाले ते खाऊन घेणे, आपल्या सारखे प्राणी उत्पन्न करणे, आणि एक दिवस पशू-पक्षा प्रमाणे मरून जाणे, यालाच ते जीवन समजतात. काय यासाठीच आपणास मनुष्य शरीर मिळालेले आहे ? नाही...

मानव शरीर खूपच दुर्लभ आहे. सांगितलेले आहे.

**दुर्लभो मनुष्य देहो !**

मानवाचे शरीर खूपच दुर्लभ आहे. भलेही ते पुरूषाचे असो की स्त्रीचे असो, खूपच दुर्लभ आहे. म्हणून सर्वच मानव देहाची इच्छा करतात. इतर तर काय स्वर्गस्थ देवता देखील या मानव देहाची इच्छा करतात...

**स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा । मृत्यू लोकी व्हावा जन्म आम्हा ।**



स्वर्गस्य देवता देखील हीच इच्छा करतात की, आम्हाला या मृत्यूभूमीमध्ये जिला कर्मभूमी नावाने ओळखल्या जाते त्या मध्ये आम्हाला जन्म मिळाला पाहिजे. तो यासाठी की...

**नाराण्या नामे होऊ जीवनमूक्त । किर्तनी अनंत गाऊ गिती ।**

विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, स्वर्गस्थ देवता देखील भोग ऐश्वर्याचा त्याग करून, भगवंताची भक्ती करून, नामस्मरण करून मुक्त होण्याच्या इच्छेने या कर्मभूमीमध्ये भोगभूमी सोडून येण्याची इच्छा करतात. कारण भोगभूमीमध्ये काहीच लाभ नाही. भोगामध्ये तर हानी ही हानी आहे. लाभ तर त्यागामध्ये, भक्तीमध्ये, भगवंताच्या स्मरण चिंतना मध्ये आहे.

म्हणून देव दुर्लभ मानव शरीर आपणास मिळालेले आहे. तर मानव शरीराचा सद्उपयोग भक्तीसाठी, मुक्तीसाठी केला पाहिजे. ज्ञानी म्हणतात की या देहाचे सार्थक केले पाहिजे. आता या देहाचे सार्थक कसे केले पाहिजे? तर म्हणतात.

**या नरदेहाचेनी लागवेगे । सार्थक करावे संतसंगे**
**निच योनी दुःख मागे । बहूत भोगीले ।।**

जर या नरदेहाचे सार्थक करायचे असेल तर, जेवढे होईल तितक्या लवकरात लवकर संताच्या संगतीत जायला पाहिजे. आणि

आपल्या देहाचे सार्थक करायला पाहिजे कारण हा मानव देह वारंवार मिळत नाही.

**एक एक योनी कोटी कोटी फेरा । मनुष्य देह वारा मग लागे**
**शेवटली पाळी तेव्हा मनुष्य जन्म । चुकलीया वर्म फेरा पडे ।।**

कोटी कोटी चौऱ्याशींचे फेरे फिरल्यानंतर मानवाचे शरीर मिळते. आणि आता जर याचे सार्थक नाही केले तर परत चौऱ्याशींचा फेरा सुरू होईल. आणि याचा तर काही भरवसा नाही की, अती दुर्लभ शरीराला केव्हा मृत्यू येईल.

**कोण समय येईल कैसा । याचान कळे की भरवसा**
**जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती**
**तैसे वैभव हे सकळ । कोण जाणे कैसी वेळ**
**पुत्र कलत्रादि सकळ । बिघडोन जाती**

जे आज आपणास मिळालेले आहे ते उद्या आपणाजवळ राहीलच असे नाही धन, वैभव, पुत्र, सगे-संबंधी काही माहीत नाही की केव्हा सोडून जातील. आणि हे ही माहीत नाही की परत भेटतील किंवा नाही. म्हणून जे आज आपल्याजवळ आहे त्याचा सद्उपयोग भवसागर तरण्यासाठी केला पाहिजे. कारण भविष्य काळात हे सर्व आपल्या जवळ राहीलच याचा काही भरवसा नाही. कारण की...



**सब दिन होत न एक समाना ।। धृ ।।**

सर्व दिवस एक सारखे नसतात. याची अनुभूती जीवनात वारंवार येत राहते. पुराणामध्ये, इतिहासामध्ये ज्या कथा सांगितलेल्या आहे त्यांचा उद्देश देखील हाच आहे की सर्वाच्याच जीवनामध्ये एकसारखी परिस्थिती नेहमी राहत नाही. जशी पुराणामध्ये हरिश्चंद्र राजाची कथा येते...

**एक दिन राजा हरिश्चंद्र गृह कंचन भरे खजाना**
**एक दिन भरै डोमघर पाणी मरघट गहे निशाना ।।१।।**

हरिश्चंद्र राजा ज्या वेळेस चालायला लागायचे तर त्यांच्या सोबत हजारो दास-दासी, सैन्य त्यांचा जयजयकार करत चालायचे. खूप मोठा धन धान्य संपदा त्यांच्या जवळ होती. परंतु काही कर्मधर्म संयोगाने त्यांच्या जीवनात अशी परिस्थिती आली की, त्यांचे राज्य चालल्या गेले, इतकेच नव्हे तर पत्नी तारामती, पुत्र रोहिदास आणि स्वतःला विकावे लागले. डोबांच्या घरी नोकर व्हावे लागले. सांगायचे तात्पर्य जीवनाध्ये एक सारखी परिस्थिती नेहमी राहत नाही.

राजा-राणीची गोष्ट सोडा भगवंत देखील जेव्हा या पृथ्वीवर अवतार धारण करतात, तरी त्यांच्या जीवनामध्ये देखील एक सारखी परिस्थिती रहात नाही. म्हणून दुसरे उदाहरण दिले.

**एक दिन राजा रामचंद्रजी जढे जाय विमाना**
**एक दिन उनका बनोबास भयो दशरथ तज्यो पराना**

भगवान रामचंद्र एक दिवस विमानाने भ्रमण करत होते. एक दिवस ही देखील परिस्थिती आली की, अनवानी पायाने म्हणजेच पायात काहीही न घालता रानावनामध्ये हे सीते, हे सीते म्हणत भटकावे लागले. आणि भगवान रामाचे पिता दशरथ महाराज एवढे बलशाली होते की इंद्राला सहायता करण्यासाठी स्वर्गामध्ये जात होते. ज्यांना रामाप्रमाणे अवतारी चार पूत्र होते. परंतु अंतसमयी एक देखील पाणी पाजण्यासाठी त्यांच्या जवळ नव्हता. हे उदाहरण देण्याचा उद्देश हा आहे की, भलेही ब्रह्म असो किंवा ब्रह्माचे पिता असो कुणाच्याही जीवनामध्ये एक सारखी परिस्थिती नेहमी राहत नाही.

अजून एक उदाहरण की, परिस्थिती नेहमी एक सारखी राहत नाही. ते आपण महाभारताचे ऐकले असेल.

**एक दिन अर्जुन महाभारत मे जीते इंद्र समाना**
**एक दिन भिल्लन लूटी गोपीका वही अर्जुन वही बाना ।।**

महाभारताच्या युद्धामध्ये कौरवाच्या पक्षामध्ये कोणी रथी, कोणी महारथी, कोणी अतिरथी तर कोणी भिष्मपितामह सारखे इच्छा मरणी तर कोणी अश्वत्थामासारखे चिरंजीवी होते. भगवान श्रीकृष्णाच्या कृपापात्र अर्जुनाने सर्वांना जिंकले, पराभूत केले. परंतु तोच अर्जुन भगवान श्रीकृष्ण निजधामाला गेल्यानंतर द्वारकेमधून गोपीकांना



हस्तिनापूरला आणत होता. त्यावेळेस काही भिल्ल लोक रस्त्यात भेटले आणि त्यांनी आपल्या तीर कमटच्याने अर्जुनाला पराजित केले. त्या वेळेस अर्जुनाजवळ तेच धनुष्य आणि तेच बाण होते जे महाभारताच्या युद्धामध्ये वापरले होते. परंतु त्या वेळेची परिस्थिती आता राहिली नव्हती. आता भगवंत जवळ नव्हते ना तशी पहिल्या सारखी परिस्थिती होती. कारण की, प्रत्येक वेळेस एक सारखी परिस्थिती राहत नाही.

आता आपण राजा-राणीची आणि इतिहास पुराणांची कथा ऐकली नसेल किंवा बघितली नसेल. तरी परंतु जीवनामध्ये कधी ना कधी अनुभव तर येतोच की जीवनामध्ये एक सारखी परिस्थिती नेहमी राहत नाही. जसे...

**एक दिन बालक भयो गोदीमा । एक दिन भयो जवाना**
**एक दिन चिता जलै मरघट पर । धूवा जात आसमाना**

कधीकधी हे देखील बघण्यास मिळते की, बालक जन्माला येते, खूप प्रेमाने बाप आपल्या मांडीवर घेऊन त्याला खाऊ पिऊ घालून मोठा करतो. त्याच्यावर अपार प्रेम करतो, अशा प्रकारे मुलगा आता जवान होतो, खूप उत्साहाने बाप त्याचे लग्न करतो. कधी कधी हे देखील बघावयास मिळते की, ज्या बापाने मूलाला मोठा केलं, त्याचं लग्न केलं, त्याची ऊन्नती बघितली काही कारणाने अचानक त्याचा मृत्यू हातो. ज्या बापाने मुलाला प्रेम देऊन मोठे केले, त्याच मुलाच्या शरीराला आता अग्नी लावून द्यावा लागतो,

बाप त्याच्या चितेच्या अग्निकडे आणि अग्निपासून, चितेपासून निघणाऱ्या धुराकडे जो आकाशामध्ये विलीन होतांना दिसतो त्याला बघून अश्रू गाळत असतो. काहीच्या नशिबात हे देखील आपल्या मुलाचे हाल बघण्याच दुर्भाग्य प्राप्त होत. सांगण्याच तात्पर्य हेच आहे की, जीवनामध्येएक सारखी परिस्थिती नेहमी राहत नाही.

या सर्व उदाहरणावरून काय बोध घ्यायला पाहिजे ? तर महापुरुष म्हणतात...

**पहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली**
**देह पडताच ठेविली । आहे निच योनी**

पहिली अवस्था म्हणजेच बाल अवस्थेमध्ये तर अज्ञान असते. म्हणून अज्ञान अवस्थेमुळे आपल्या जीवनाचे सार्थक कशात आहे समजत नाही. त्यामुळे खेळण्यातच बाल अवस्था निघून जाते.

दुसरी अवस्था जी तारुण्य अवस्था सर्वानाच मिळते असे नाही. आणि समजा जर मिळालीच तर सत्संगती नसेल तर ती तारुण्य अवस्था विषय विकारामध्ये व्यसनामध्ये व्यर्थ बरबाद (नाश) होऊन जाते. देहाचे सार्थक कशात आहे समजून देखील देहाचे सार्थक करून घेत नाही. तारुण्य अवस्था केव्हा समाप्त झाली, हे समजण्याच्या पूर्वीच वृध्दावस्था येते. देहाचे सार्थक कशात आहे हे आता समजून येते. परंतु जरा जर्जर अवस्थेमुळे काहीही करणे अशक्य वाटते. साधे सोपे भगवंताचे नाम घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु भगवंताचे नाम मुखात येत नाही. एक संत म्हणतात...



**राम राम म्हणाया जात । तिथे लांब लांब येत**

आता मुखाने शुध्द रामनामाचा उच्चार करता येत नाही. आता लांब लांब येत म्हणजेच दूर दूर अशा भावार्थाचा शब्द मुखातून मोठ्या कष्टाने बाहेर येतो. भगवंताला आता लांब लांब म्हणाल तर भगवंत जवळ कसा येईल ? वृध्द अवस्थेमध्ये चिंता काळजी परेशानींचा सामना करता करता जीवन समाप्त होऊन जाते. तेंव्हा मृत्यू येतो !

भगवंताचे स्मरण केले नाही, काही सत्कर्म केले नाही. जप, तप, अनुष्ठान, सत्संग, प्रवचन इत्यादीचा जीवनामध्ये लाभ घेतला नाही. धर्म-अधर्म, पाप-पुण्य, सत्कर्म-दुष्कर्म काहीच जाणले नाही. काय खायला पाहिजे, काय खाऊ नये, काय प्यायला पाहिजे, काय पिवू नये याचा मला काहीच विवेक धारण केला नाही. मनामध्ये जे आले खाऊन घेतले, पिले, ऐकले, केले. तर त्या दुष्कर्माचे, पापाचे, अविविकाचे फळ तर भोगावेच लागते. ते कसे तर निच योनीमध्ये जन्म धारण करून दुःख ही दुःख भोगावंच लागते. निच योनी कोणती ? तर म्हणतात.

**श्वान सुकारदिक निच याती । भोगने घडे की विपत्ती**
**तेथे काही उत्तम गती । पाविजेत नाही**

श्वान आणि सुकर सारख्या निच गतीला जीव जातो. श्वान म्हणजे कुत्रे आणि सुकर म्हणजे डुक्कर. अशा अधम गतीला जीव जातो.

विष्ठेतील किडा किंवा नाली मधील जीव-जंतू इत्यादी होऊन दुःख ही दुःख भोगत राहतो.

विवेक विसरून जो धर्म-अधर्म, पाप-पुण्य न जाणता आपल्या देहाचे पोषण करतो त्यालाही अंती तर मरावेच लागते.

**जन्मला देह पोसिला सुखा । काय भरवसा याचा आहे**
**एकलेची यावे एकलेची जावे । हे अपुभवावे आपणची**

कितीही ऐश आरामामध्ये जीवन जगा, परंतु शेवटी तर मरावेच लागते. जीव एकटाच येतो व एकटाच जातो. जीवन जगण्यासाठी कितीही प्रयास करा परंतु शेवटी...

**आयुष्य शेवटी सोडून जाणार । नव्हेची साचार शरीर हे**

संत तुकाराम महाराज अभगांच्या तिसऱ्या चरणामध्ये म्हणतात की, अमर होण्यासाठी कितिही प्रयत्न करा, परंतु शेवटी मरावेच लागेल. शरीर सुटून जाईल. कारण हे शरीर आपले नाही. शरीर आपले नाही तर आहे कुणाचे ? संत बहिणाबाई म्हणते...

**पाचाचे उसने घेऊनी शरीर । आलासी ते सार ब्रम्ह साधी**
**कासाया काबाड वाहतोसी ओझे । लटिके ते तुझे नोव्हे जाण**



हे शरीर आपले नाही. हे तर पंचमहाभुतांचे आहे. पंचमहाभुताकडून ब्रम्हा प्राप्तीसाठी हे काही दिवसांसाठी उसने मिळालेले आहे. पृथ्वी, तेज, जल, वायू, आकाश या पंचमहाभुताचे हे शरीर आहे. एक निश्चित अवधी समाप्त होताच ब्रम्हाची प्राप्ती करून घेतली नाही. तरी देखील हे शरीर मातीत मिळून जाईल संत नरहरी महाराज म्हणतात...

**शरीराची होय माती । कोणी न येती संगती**
**सारी अवघे कामे खोटी । अंती जाणे म्हसनवटी**
**गोत घरे टाकुनी सारी । शेवटी गावाचे बाहेरी**
**स्वजन आणि गणगोत । उपाय नाही हो चालत**

शरीराला जाळून टाकले किंवा मातीमध्ये दफन केले. शेवटी तर या शरीराची मातीच होणार आहे. जेव्हा मृत्यू होतो तेव्हा कोणी दरवाजापर्यत कोणी गावाच्या वेशीपर्यत, तरी कोणी स्मशानापर्यत येतो. त्यानंतर आपल्या सोबत कोणीही येत नाही. जेव्हा जीवाचे शरीर स्मशानामध्ये नेल्या जाते. तेंव्हा जीवाला कळते की कितीही मोठे गाव असो किंवा शहर असो, त्याच्यामध्ये आपला कितीही मोठा बंगला असो, खूप मोठे मोठे आपले सगे संबंधी असो परंतु सर्वांना सोडून एकट्यालाच जावे लागते. मग आपली इच्छा असो अगर नसो. म्हणून मनाला समजाविले पाहिजे, जसे संत रामदास स्वामी आपल्या मनाला समजावतात...

**मना सज्जना सत्य हे मृत्यूभुमी । जीता बोलती सर्वहि जीव मी मी चिरंजीव हे सर्वही मानीताती । अकस्मात सोडूनिया सर्व जाती**

हे मनोबा ! सत्य तर हे आहे की तू आपल्या शरीराला कितीही चिरंजीव मान परंतु लक्षात ठेव की ही मृत्यूभूमी आहे, आणि येथे जोही येतो त्याला एक ना एक दिवस जावेच लागते. जसे येथे जे येतात. त्या सर्वांना जावेच लागते. आता आपली पाळी आहे. आपल्याला देखील जावेच लागेल. कोणाच्या मनामध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतो की केव्हा जावे लागेल ? याचा निर्णय तर काळच करतो. कारण की, संत तुकाराम महाराज अभंगाच्या अंतिम चरणामध्ये म्हणतात...

**तुका म्हणे काळे लावियेले माप । जमा धरी पाप पुण्याची ही**

अभंगाचा हा अंतिम चरण खूपच विचार करण्यासारखा आहे. कारण अभंगाची रचना करण्याचा उद्देश हाच आहे. जो या अंतिम चरणामध्ये सांगितलेला आहे. संत तुकाराम महाराजांनी या ठिकाणी दोन गोष्टि सांगितल्या. पाहिली गोष्ट ही आहे की, काळाने माप लावले आहे की आयुष्य अजून किती बाकी आहे.

**घडी घडी काळ वाट याची पाहे । अजून किती आहे अवकाश**

क्षणोक्षणी काळ हेच पाहत राहतो की, याच आयुष्य अजून किती बाकी आहे. आयुष्य संपताच काळ त्याला घेऊन जातो. काळ



त्याला कसा घेऊन जातो हे समजावण्यासाठी तुकाराम महाराज एका दुसऱ्या अभंगामध्ये म्हणतात.

**पहा तो उंदिर घेऊन जाय बोका । तैसा काळ लोका नेत असे**

किती सत्य आणि समर्पक उदाहरण दिले. ते म्हणतात की, आयुष्य समाप्त होताच जीवाला काळ घेऊन जातो . कसा ? तर म्हणतात जसे मांजर उंदराला घेऊन जाते तस जीवाला काळ घेऊन जातो. जसे मांजर रात्रं-दिवस, शुभदिवस-अशुभदिवस, महान-मोठा, नर-मादी याचा काहीच विचार करत नाही. तसेच काळ रात्र असो की दिवस, शुभ दिवस असो की अशुभ दिवस, मोठा असो की लहान, नर असो की नारी सर्वांनाच घेऊन जातो.

दुसरी महत्त्वपूर्ण गोष्ट अंतिम चरणामध्ये ही सांगितली की...

**जमा धरी पाप पुण्याची ही ।।**

जीवाने कितीही कर्म केले असेल तरी त्या कर्मापैकी हिशोब केवळ पाप आणि पुण्याचाच होतो आणि सर्व म्हणतात की, पुण्यांने सुख सद्‌गती मिळते. आणि पापाने दुःख व दुर्गती मिळते. म्हणून जीवनामध्ये पुण्य कर्म केले पाहिजे. आणि पाप कर्मापासून निवृत्त राहिले पाहिजे. पुण्य कर्माने स्वर्गादी शुभगती आणि पाप कर्माने नरकादी अशुभगती प्राप्त होते. म्हणून मनामध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतो की, पुण्य आणि पाप कशाला म्हणतात. पुण्य काय आहे व

पाप काय आहे ? थोडक्यात पाप पुण्याची व्याख्या संतांनी केलेली आहे. जसे संत तुकाराम महाराज म्हणतात...

**पुण्य पर उपकार पाप ते पर परपीडा । आणिक नाही जोडा दुजायासी**

जीवनामध्ये जीवावर कृपा करणे, परोपकार करणे जेणे करून त्याला परिणामी सुख मिळेल असे कर्म करणे हेच पुण्य आहे. आणि दुसऱ्याला पिडा, दुःख देणे, आणि परिणामी त्याचे अधःपतन होईल असे कर्म करणे हेच पाप आहे.

संत सेना महाराज देखील पाप पुण्याबद्दल हेच म्हणतात...

**करिता परोपकार । त्यांच्या पुण्या नाही पार**
**करिता परपिडा । त्यांच्या पापा नाही जोडा**

थोडक्यात परोपकार करणे हेच पुण्य आहे व परपिडा करणे हेच पाप आहे.

जीवनामध्ये नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, जीवनामध्ये नेहमी पुण्य कर्म करत राहिले पाहिजे. एखाद्याच्या मनात प्रश्न निर्माण होऊ शकतो की पुण्य कर्मच का करायला पाहिजे ? पुण्य कर्माने सुख का मिळते? याचे उत्तर हेच आहे की, सुख प्राप्तीसाठी ईश्वराची प्राप्ती झाली पाहिजे. कारण सुखाचा मूलमंत्र सांगतांना संत तुकाराम महाराज म्हणतात...



**आपूला तो एक देव करूनी घ्यावा । तेणेविन जीवा सुख नाही.**

भलेही आपण कौरवासारखे कितीही प्रयत्न केले. छळ, बळ, कपट करून धन कमविले. राज्य प्राप्त केले परंतु भगवंताच्या प्राप्ती शिवाय सुखाची प्राप्ती शक्यच नाही. म्हणून सुखाची प्राप्ती होण्यासाठी भगवंताची प्राप्ती अत्यंत आवश्यक आहे आणि भगवंताच्या प्राप्तीसाठी पुण्यांची अत्यंत आवश्यकता आहे. जसे संत तुकाराम महाराज म्हणतात...

**देवासाठी जाणा तयासीच आटी । असेल ज्या गाठी पुण्यरासी**

भगवंताच्या प्राप्तीसाठी तोच अट्टाहास प्रयास करतो की, ज्याच्याजवळ पुण्यांची रासही रास असेल. ज्याच्या जवळ पुण्य नाही. पाप ही पाप आहे तो कधी भगवंताच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करू शकत नाही. म्हणून त्यांच्या जीवनामध्ये कधीच सुख, समाधान, शांततेची प्राप्ती होऊच शकत नाही. त्याची कधी सद्‌गती होऊ शकत नाही. म्हणून भगवंताची प्राप्ती, सुख, समाधान, शांतता आणि सद्‌गती पुण्यांची प्राप्ती होणे अतिशय आवश्यक आहे. हे सर्व ऐकल्यानंतर मनामध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतो की, आम्हाला पुण्यांची प्राप्ती कशी होऊ शकेल ? पुण्य प्राप्तीचा उपाय काय आहे ? पुण्य प्राप्तीचा उपाय देखील संत तुकाराम महाराजांनी सांगितलेला आहे. तो हा...

**निर्बळा पाठवी बळे वाराणसी । गेला आला त्यासी अर्धे पुण्य**
**कथे निद्राभंग करावा भोजनी । तया सुखा धनी पार नाही**

जो तनाने, मनाने, धनाने निर्बळ असेल, तर त्याला तनाने, मनाने, धनाने बल देऊन वाराणसी किंवा अन्य क्षेत्राला जेथे पुण्य कर्म होत असेल तेथे त्याला पाठविले पाहिजे. भलेही त्याला जबरदस्ती तेथे पाठविले असेल आणि तो तेथे जाऊन पुण्य कर्म करून आला तर, त्याचे अर्धे पुण्य पाठविणाऱ्याला मिळते. जसे येथे जे अनुष्ठान होत आहे. त्याच प्रमाणे द्रव्य यज्ञ, तप यज्ञ, जप यज्ञ, ज्ञान यज्ञ होत आहे, सत्संग-प्रवचन होत आहे. यासाठी ज्यांनी ज्यांना तन, मन, धनाने सहयोग देऊन पाठविले तर पाठवणाऱ्यांना घर बसल्या पुण्य मिळते. सुख प्राप्तीसाठी देखील सांगितले की, कथेमध्ये जो झोपतो त्याला जागविले पाहिजे. म्हणजे जेणे करून तो कथा ऐकेल. ज्याच्यामुळे त्याची व्यथा दूर होईल. जो कथेमध्ये झोपणाऱ्यांना जागवतो आणि उपाशीपोटी झोपणाऱ्यांना जागवून त्याला जेवू घालतो त्याला अपार सुख मिळते. येथे देखील एक शंका निर्माण होऊ शकते की, धनाने सहयोग देण्यासाठी किंवा भोजन देण्यासाठी जर आमच्याजवळ धन नसेल तर काय करावे ? याचे उत्तर देखील तुकाराम महाराज देतात ते म्हणजे...

**यागी ऋण घ्यावे द्यावे सुख पाही । बुडता चिंता नाही उभयता**
**तुका म्हणे वर्म जाणोनी करावे । एक न घालावे एकावरी**



यागी म्हणजे यज्ञासाठी धनाने सहयो देण्यासाठी आपल्याजवळ काही नसेल तर ऋण म्हणजे कर्ज घेतले पाहिजे. तसे तर महापुरुष म्हणतात की, कर्ज घेऊ नये आणि जर घेतले तर म्हणतात की...

**राहू ना दे बाकी । ज्याचे त्याला देऊन टाकी ।।**

कर्ज घेऊ नये, आणि जर घेतले तर मृत्यूच्या पूर्वी होईल तितक्या लवकात लवकर वापस दिले पाहिजे. नाहीतर मेल्यानंतर बैल, म्हैस होऊन का होईना घेतलेले कर्ज वापस द्यावेच लागते. म्हणून संत तुकाराम महाराज देखील म्हणतात. आपल्या संसारासाठी नव्हे तर यज्ञासाठी आपल्या जवळ धनाने सहयोग देण्यासाठी काही नसेल तर ऋण म्हणजेच कर्ज घेतले पाहिजे. आणि दिलेही पाहिजे. जसे की येथे ज्ञान यज्ञ, तप यज्ञ आणि सर्वात महान जपयज्ञ चालू आहे. भगवान श्रीकृष्ण गितेमध्ये विभूतीयोग नामक अध्यायामध्ये म्हणतात...

**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि । स्मावराणां हिमालयः**

या संसारामध्ये जेवढे यज्ञ असेल त्या सर्व यज्ञामध्ये जपयज्ञ ‘मी’आहे.

परोपकार तसेच अन्न, वस्त्र इत्यादी देऊन सेवा करणे हे देखील यज्ञच आहे. अशा यज्ञासाठी किंवा सहयोग देण्यासाठी कर्ज

घेतले पाहिजे व दिले देखील पाहिजे. जर असे ऋण म्हणजे कर्ज बुडाले तर? संत तुकाराम महाराज म्हणतात की...

**बुडता चिंता नाही उभयता ।।**

ज्याचे बुडाले आणि ज्याच्याकडून बुडाले त्या दोघानींही चिंता करण्याचे काहीही कारण नाही. दोघानींही चिंता करण्याचे काहीही कारण नाही असे का ? तर यासाठी एक कथा जरून ऐकली पाहिजे. कथा या प्रकारे आहे.

महाराष्ट्रामध्ये दामाजीपंत नामक एक खूप मोठे भगवद्‌भक्त होऊन गेले. एक वेळेस दुष्काळ पडला. लोक अन्न न मिळाल्यामुळे मरायला लागले. दामाजीपंताजवळ जेवढे धान्य होते, ते सर्व त्यांनी वाटून टाकले. परंतु दुष्काळ समाप्त झाला नाही. बादशाहाचे अन्नाचे भांडार भरलेले होते. परंतु बादशाहला भुकेने मरणाऱ्याबद्दल जसे काही घेणे देणे नव्हते. म्हणून दामाजीपंताने बादशाहाचे अन्नाचे भांडार सर्व दुष्काळ पिडितांना वाटून टाकले. बादशाहाला याची बातमी मिळताच बादशाहा दामाजीपंताकडून पैसे वसूल करण्याचा किंवा पैसे न दिल्यास बंदी बनविण्याचा विचार करायला लागला. त्याचक्षणी भगवंत त्या ठिकाणी पोहचले आणि बादशाहाला म्हणाले की, मी दामाजीपंताचा नोकर आहे. दामाजीपंतानी जे धान्य वाटले त्याचे पैसे घेऊन आलेलो आहे. आणि भगवंताने पूर्ण पैसे बादशाहाला दिले. जेवढे दामाजीपंतानी धान्य वाटले होते. ना बादशाहाचे काही बुडाले, ना दामाजीपंताकडून काही बुडाले...



म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात की, परोपकार करून पुण्य करायलाच पाहिजे. त्यासाठी आपणाजवळ काही नसेल तरी जेवढे होईल तेवढे परोपकार पुण्य कर्म करायलाच पाहिजे. परंतु लक्षात ठेवा संत म्हणतात की कधी चुकून देखील पाप कर्म करू नका. कारण पापामुळे सर्वांनाच दुःख ही दुःख होते जसे...

**पापाचिया मुळे । झाले सत्याचे वाटोळे**
**दोष झाले बळीवंत । नाही ऐसी झाली नित**
**मेघ पडो भिती । पिके सांडीयली क्षीती**

पापामुळे सत्याचा नाश होतो. सत्याचा नाश होताच संसारामध्ये दोषही दोष आणि अनिती ही अनिती पसरते. जगातून सत्य आणि नितीचा लोप होताच ढगापासून पाऊस पडत नाही. किंवा कमी पडतो आणि अन्नधान्याचा अभाव होऊन वारंवार दुष्काळाचे संकट निर्माण होऊन दुःख ही दुःख दिसायला लागते. सारांश हे की पापी लोकामुळे संसारामध्ये किती दुःख निर्माण होते आणि जो स्वतः पाप कर्म करतो त्याला संसारामध्ये किती दुःख भोगावे लागते याचे वर्णन संत नामदेव महाराज एक अंभगामध्ये करतात..

**तप्त ताम्र भूमी लोळविती नरा । लोटीती अघोर नरकामाजी**
**जळतीया खांबा भेटविती बळे । खैराच्या इंगळे नाहाविती**
**प्रल्य क्रूर सर्प झोंबविती कंठासी । ओढोनी जिव्हेसी खंडे करिती**
**नामा म्हणे ऐसी पापीष्ठाची गती । जन्म लक्ष क्षती हेची फळ**

जो पाप कर्म करतो, त्याला तप्त भूमीवर झोपवतात. अघोर नामक नरकामध्ये ढकलून देतात. जळत्या खांबाला जबरदस्ती बांधतात. खैराच्या आग्नीने त्याला स्नान घालतात. क्रूर सर्पाद्धारे त्यांच्या कंठाला दंश करवितात. त्याची जीभ बाहेर काढून त्याच्या जिभेचे तुकडे तुकडे करतात.

असे एक दोन जन्म नाही तर लाखो जन्म असेस दुःख त्याला भोगावे लागते. म्हणून पाप कर्म करू नये. तर काय करायला पाहिजे तर.. सत्संग प्रवचन सुरू होण्यापूर्वी जसे सांगितले होते की...

**चल स्वरुप जोबन सूचल । चल वैभव चल देह**
**चला चली के वक्त मे । भला भली कर लेह**

स्वरुप, तारूण्य, वैभव, देह सर्व नाशवान आहे. या सर्वांचा नाश होण्यापूर्वी जीवनाचे सार्थक करून घेतले पाहिजे. आपल्या जीवनाचे सार्थक करण्यासाठी अभंगाचे वारंवार स्मरण चिंतन तर करायलाच पाहिजे. त्याच प्रमाणे ब्रह्मानंदजी महाराजांच्या भजनाचे स्मरण देखील करायला पाहिजे. ब्रह्मानंदजी महाराज आपल्या भजनामध्ये म्हणतात...

**दो दिनका जगतमे मेला । सब चलाचली का खेल ।।**

जगामध्ये जसा काही ठिकाणी मेळा भरतो. लोक एकत्र जमतात. भाऊ, बहीण, काका, काकी, आजोबा, आजी असे एकमेकांना म्हणतात.



आणि थोड्या वेळानंतर आपापल्या रस्त्याने चालल्या जातात. तसाच हा सर्व संसार एक मेळा आहे. येथे जो येतो तो..

**कोई चला गया कोई जावे । कोई गठडी बांध सिधावे**
**कोई खडा तैयार अकेला ।।१।।**

या संसाररूपी मेळया मधून कुणी चालल्या गेला. कुणी जाण्याची तयारी करत आहे. कुणी पाप पुण्य रूपी गाठोडे बांधत आहे. कुणी एकटाच जाण्यासाठी तयार आहे. परंतु लक्षात ठेवा.

**कर पाप कपट छल माया । धन लाख करोड कमाया**
**संग चले न एक अधेला ।।२।।**

भलेही कितीही कौरवाप्रमाणे पाप, कपट, छळ, करून लाखो रुपये कमावले असेल. परंतु अंती सोबत एक पैसा देखील येणार नाही. कारण मूळ अभंगामध्ये संत तुकाराम महाराजांनी सांगितलेले आहे की...

**माय बाप सवे नये धन वित्त ।**

येथे देखील ब्रह्मानंदजी महाराज म्हणतात...
**सूत नारी मातू पीतू भाई । कोई अंत सहायक नाही**
**क्यो भरे पाप का ठेला ।।३।।**

आई-वडील, भाऊ-बहीण, पती-पत्नी कोणीही अंत काळी सहाय्य करू शकत नाही. तसेच सोबत देखील येऊ शकत नाही. तर मग का पाप करायचे? कारण पापाचे फळ तर दुःखाच्या रूपाने या लोकामध्ये आणि नरकामध्ये जाऊन भोगावेच लागते. हे सर्व सांगण्याचा सारांश हाच आहे की...

**यह नश्वर सब संसारा । कर भजन ईश का प्यारा**
**ब्रह्मानंद कहे सून चेला ।।४।।**

हा सर्व संसारच नश्वर आहे आणि ईश्वराचे भजनच सार आहे. म्हणून ईश्वराला प्रार्थना करायला पाहिजे की, हे प्रभू माझ्यावर कृपा कर की मी रात्रंदिवस आपलेच भजन चिंतन, स्मरण केले पाहिजे.



**अब प्रभू कृपा करहू यही भाँती ।**
**सब तजी भजन करहू दिन राती ।।**
**जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।**
**जय रघुनंदन जय सीयाराम । ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।**
**रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।**
**श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।**
**विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।**
**दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।**
**आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।**

**ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव**
**गोपाल कृष्ण भगवान की जय**
**श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन**
**सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय**
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय**

❖ ❖ ❖ ❖ ❖

स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळा पासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्‌गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्‌गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |